# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक ०३/०५/२०२६ (रविवार)

---

## पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत धामणगाव (वैदय) येथील आगीच्या घटनेत पोलीसांची तत्पर कार्यवाही

पोलीस स्टेशन भिवापुर :— दिनांक ०२/०५/२०२६ रोजी पोलीस स्टेशन भिवापुर हद्दीतील धामणगाव (वैदय) या गावात आग लागल्याची माहीती भिवापुर पोलीसांना प्राप्त होताच भिवापुर पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले. परिस्थीतीचे गांभिर्य लक्षात घेता पोलीसांनी तात्काळ कार्यवाही सुरू करत नागपुर शहर आणि ग्रामीण तालुक्यातुन ७ अग्निशमन वाहनांना बोलाविले. तसेच दंगा नियंत्रण पथकाला सुध्दा घटनास्थळी मदतकार्यासाठी बोलाविण्यात आले. सदर घटनेची माहीती प्राप्त होताच मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन परिस्थितीचा आढावा घेतला.

मा. पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनात भिवापुर पोलीसांनी प्रभावी बचाव व मदतकार्य पार पाडले. पोलिसांनी आगीत अडकलेल्या दोन ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित बाहेर काढले. तसेच परिसरातील गॅस सिलेंडस तातडीने हटवले त्यामुळे संभाव्य स्फोटाचा धोका टाळला. सदर घटनेत बाधीत कुटुंबीयांसाठी महसूल विभाग व ग्रामपंचायतीच्या समन्वयातून स्थानिक शाळेमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.तसेच काही कुटुंबीयांना त्यांच्या नातेवाईकांकडे स्थलांतर करण्यासाठी पोलिस विभागामार्फत ४ बसची व्यवस्था करण्यात आली. सदर घटनेत कोणतीही मानवी जीवितहानी झालेली नाही.सुमारे २५ घरे आगीत जळून नुकसानग्रस्त झाली आहेत. गावलगत कैलस ढाकुलकर यांच्या शेतातील धुरा जाळण्यात आला होता. त्यानंतर वादळ सुटल्याने सदर शेतातील आग अचानक गावतपर्यंत पोहचली

आणि वादळ वा—या मुळे आग वेगाने गावात पसरली. सदर प्रकरणी शेतमालक कैलास ढाकुलकर यांच्या विरूध्द कलम ३२६ (ग) भा.न्या.सं (विस्तावाद्वारे आगळीक करणे) या कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर घटनास्थळी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी , उमरेड उपविभाग यांच्या सह महसुल विभागाचे अधिकारी यांनी सुध्दा भेट दिली आहे.या संपूर्ण कार्यवाहीदरम्यान उल्लेखनीय कामगिरी करणारे क्रं १) सहा पोलीस निरीक्षक रवींद्र मस्कर , प्रभारी अधिकारी,पोलीस स्टेशन भिवापुर,२) पोलीस उपनिरीक्षक सचिन उरकुडे, ३) पोलीस उपनिरीक्षक राकेश बोदेले, ४) पोलीस उपनिरीक्षक विजय माळी, ५) पोहवा ब.नं ८५१ योगीराज वंजारी, ६) पोहवा ब.नं ७८५ आनंद धात्रक, ७) पोहवा ब.नं ९२४ प्रवीण जाधव, ८) पोना ब.नं २१६७ रवींद्र जाधव, ९) पो.अं ब.नं २२३९ मनोज चाचेरे ,१०) पो. अं ब.नं २२९८ मिलिंद राठोड , ११)पो.अं ब.नं २२२० दीपक ढोले, १२) पो.अ ब.नं २१९० स्वप्निल ठाकरे ,१३) पो.अ ब.नं ९४६ रवी वानखेडे , १४) पो.अं ब.नं २००४ अंबादास तुपे यांच्या धाडसी व तत्पर कामगिरीची दखल घेऊन मा. पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी प्रत्येकास १५०००/— रूपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.



सपोनि रविंद्र मस्कर



पोउपनि सचिन उरकुडे



पोउपनि राकेश बोदेले



पोउपनि विजय माळी



पोहवा योगीराज वंजारी



पोहवा प्रवीण जाधव



पोहवा आनंद धात्रक



पोना रवींद्र जाधव



पो अं मनोज चाचेरे



पो अं मिलिंद राठोड



पो.अं दीपक ढोले



पो.अं स्वप्नील ठाकरे



पो.अ रवी वानखेडे



पो.अं अंबादास तुपे

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने